प्रेस नोट दिनांक १९/०७/२०१९

## विश्रांतवाडी पोलीस स्टेशन,पुणे

## महीला पोलीस व सामाजीक कार्यकर्त्या यांचे सतर्कतेमुळे बसमध्ये पाकीटमारी करणा-या महीलांच्या टोळीला विश्रांतवाडीत अटक

दिनांक १८/७/२०१९ रोजी दुपारी १.३० ते २.०० वा सुमारास मनपा ते विश्रांतवाडी मार्गे लोहगाव बस मध्ये मपोना नलीनी सांवत नेमणुक पोलीस मुख्यालय पुणे शहर या साधे गणवेशात व शांतीनगर भागातील सामाजीक कायकर्त्या श्रीमती सुनिता रमेश वाघमारे वय ४० वर्षे या पीएमपीएल बसने प्रवास करत असताना बस मध्ये तीन महीला कडेवर लहान मुलांना घेवुन प्रवास करत असताना बसमधील काही प्रवाशांनी त्यांना बसण्यासाठी जागा देवु केल्या होत्या परंतु त्या महीला सीटवर न बसता मुलांना कडेवर घेवुन बसमधील उभ्या राहीलेल्या दुस-या महीला प्रवाशांना घेरुन मुलांना सारख्या या कडेवरुन त्या कडेवर करताना त्यातील एका महीलेने महीला पोलीस नाईक सावंत यांना त्यांच्या पर्समध्ये हात घालुन चाचपडताना जाणवले त्यांनी सतर्कतेने त्यांच्यावर पाळत ठेवली त्याचवेळी दुस-या महीलेने त्यांच्या पुढे उभ्या असणा-या सुनिता वाघमारे यांचे पर्समध्ये लहान मुलांचे अडुन हात घालुन पर्समधुन काहीतरी वस्तु काढल्या त्यावेळी त्यांना सदर महीला या बस मधील चोरी करणा-या असल्याचा संशय आला त्यावेळी त्या महीला गडबडीत बसमधुन खाली उतरु लागल्या त्यावेळी पोलीस सावंत यांनी त्या महीलांना दरवाज्यात अडवुन ड्रायव्हरला या महीला बसमध्ये चोरी करणा-या आहेत. त्यांनी माझे व बस मधील वाघमारे यांच्या पर्स मधुन चोरी करताना मी पाळत ठेवुन पाहीले आहे.तुम्ही गाडी कोणालाही बसमधुन खाली न उतरवता विश्रांतवाडी पोलीस स्टेशनला घ्या असे सांगुन गाडी पोलीस स्टेशन येथे आणली व त्या महीलांना वाघमारे यांच्या मदतीने बसमधुन उतरवुन सपोनि यादव यांचे समक्ष हजर केले.त्यावेळी त्यांच्याकडे त्यांचे नाव पत्ता विचारले असता सदर महीलांनी त्यांची नावे पत्ते १) पुजा धर्मा गाज वय २० वर्षे, रा. सरोदे कॉलनी मुंढवा पुणे २) श्वेता राजेश गाज वय २० वर्षे रा सदर ३) सपना ऊर्फ डेविड गाज वय २५ वर्षे रा सदर अशी सांगितली त्यांची महीला पोलीसांच्या मदतीने अंगझडती घेतली असता महीला पोलीस सावंत यांचे पर्समधील २०००/-रुपये व वाघमारे यांचे पर्समधील १०००/- रुपये तसेच वाघमारे यांचे पर्समधील चोरलेल्या चांदीचे पैजन व रोख रक्कम १३,८२०/- रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे.त्यबाबत श्रीमती सुनिता रमेश वाघमारे वय ४० वर्षे व्यवसाय -समाजकार्य रा. सर्वे नं ११०/१११ बौध्द विहारासमोर, शांतीनगर, येरवडा, पुणे यांनी वरील महीलांचे विरुध्द तक्रार दिल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी महीला पोलीस नाईक ६२२२ नलीनी सावंत नेमणुक पोलीस मुख्यालय शिवाजीनगर यांनी स्वतः केली आहे.त्याकामी विश्रांतवाडी पोलीस स्टेशनकडील सपोनि संदीप यादव, मपोउपनिरी, शुभांगी कामेगावकर,मपोना कामीनी पवळे,मपोना मानसी मोरे, मपोशि निर्मला वांळुज व पोना प्रविण भालचिम, पो.ना किशोर दुशींग यांनी मदत केली आहे.